महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**विशेष पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ**

**दिनांक : १७/०३/२०२३**

---

## मारेगांव शहरातील बंगाली डॉक्टर ला पिस्तुलाचे धाकावर अपहरण करुन खंडणी वसुल करणाऱ्या टोळीला निष्पन्न करुन ०१ दिवसांतच गुन्हा आणला उघडकीस
## स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ व पो.स्टे. मारेगांव येथील पथकाची संयुक्त कारवाई

दिनांक १३/०३/२०२३ रोजी चे रात्री सुमारास मारेगांव येथील बंगाली डॉक्टर पोभास रविंद्रनाथ हाजरा हे आपला दवाखाना बंद करुन त्यांचे मोटार सायकलने घरी जात असतांना एका चारचाकी वाहनातुन आलेल्या आरोपीतांनी आपले वाहन त्यांचे मोटार सायकल समोर लावुन त्या चारचाकी वाहनातील तिन अनोळखी इसमांनी डॉक्टर पोभास यांचे कानाला पिस्तुल लावुन त्यांना गाडीत बसवुन त्यांचे अपहरन केले व त्यांना चाकुचा धाक दाखवुन त्यांचे अंगावरील सोन्याची अंगठी व मोत्याचा गोफ तसेच नगदी २४,००० /रु असा एकुण ४५,०००/- रु चा मुददेमाल हिसकावुन घेवुन त्यांचे सुटके साठी २५ लाखाची खंडणी मागीतली त्यावरुन डॉ. पोभास यांनी आपल्या मित्राकडुन सदरचे आरोपीतांना ३,००,०००/- रु दिल्याने आरोपीतांनी त्यांची सुटका केली. सदर प्रकरणी फिर्यादी डॉ. पोभास हाजरा यांनी पो.स्टे. मारेगांव येथे दिलेल्या फिर्याद वरुन अज्ञात आरोपीतांविरुध्द अप.क्र. १८८/२३ कलम ३९२,३६३,३६४(अ), भादवि सहकलम ३/२५,४/२५ आर्म ॲक्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

अशा स्वरुपाची गंभीर घटना घडली असल्याने लागलीच शेजारील जिल्हे व तेलंगना राज्यातील आदीलाबाद येथील पोलीस नियंत्रन कक्षांना तात्काळ सतर्क करुन आपआपले परिसरात नाकाबंदी लावण्या बाबत कळविण्यात व स्था.गु.शा. तसेच पो.स्टे. मारेगांव येथील पथके तयार करुन आरोपीतांचे मागावर रवाना करण्यात आले दोन्ही पथकांना अदिलाबाद येथील पोलीसांशी समन्वय साधुन कारवाई करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या त्यावरुन सदरची पथके अदिलाबाद पोलीसांचे संपर्कात असतांना मारेगांव येथील घटनेच्या काही तासातच रात्री दरम्याण अदिलाबाद येथे सुध्दा नमुद आरोपीतांनी मारेगांव सारखीच घटना करण्याचा प्रयत्न केला परंतु यवतमाळ पोलीसांनी अदिलाबाद पोलीसांना सतर्क केले असल्यामुळे अगोदरच अदिलाबाद शहरात नाकाबंदी लावण्यात आल्यामुळे आरोपीतांचा प्रयत्न अयशस्वी झाला व त्यांनी वाहन तेथेच सोडुन पळ काढला त्यातील ०२ आरोपीतांना पकडण्यात अदिलाबाद पोलीसांना यश आले वेळीच स्था.गु.शा.यवतमाळ तसेच पो.स्टे. मारेगांव येथील पथक तेथे पोहचुन त्यांनी अदिलाबाद पोलीसांशी समन्वय साधुन माहिती वेळेत पोहचविल्यामुळे त्यातील अधिक ०३ आरोपीतांना झांसी येथुन ताब्यात घेतले आहे.

अशा प्रकारे यवतमाळ पोलीसांनी घटना घटताच शेजारील जिल्हे व अदिलाबाद पोलीसांना सतर्क केल्यामुळे तसेच तात्काळ माहितीचे आदानप्रदान व समन्वयातुन २४ तासाचे आत मारेगांव येथील गुन्हयातील आरोपी निष्पन्न केले आहेत. कोर्ट कार्यवाही करुन आरोपीतांना ताब्यात घेवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

सदरची कारवाई ही सर्व वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ व मारेगांव पो.स्टे. येथील पथक यांनी अदिलाबाद स्थानिक गुन्हे शाखेशी समन्वय साधुन यशस्वीरित्या पार पाडली आहे.


(शुभांगी गुल्हाणे)
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक, कार्यालय,यवतमाळ